रयत शिक्षण संस्थेचे

# आर्ट्स ,सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली)

## भूगोल विभाग एक दिवसीय राष्ट्रीय परिसंवाद

## “कोविड-19 च्या काळातील भौगोलिक वातावरण’’

दि॰ 15 जुलै 2020 वेळ: स. 10.30 वाजता

---

भूगोल विभाग व IQAC मार्फत महाविद्यालयात ऑनलाइन पद्धतीने “कोविड-19 च्या काळातील भौगोलिक वातावरण’’ या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिसंवाद बुधवार दि. 15 जुलै 2020 रोजी सकाळी 10.30. वाजता संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भूगोल विभाग प्रमुख डॉ. खाडे ए. एस. यांनी केले. त्यांनी भूगोल विभाग व विविध कौर्सेस बद्दल माहिती दिली. कोविड-19 च्या काळातील सामाजिक व भौगोलिक परिस्थिती बद्दल आपले विचार मांडले. सर्व सहभागी अध्यापक व संशोधक आणि विद्यार्थी या सर्वांचे त्यांनी स्वागत केले. परिसंवादातील सहभागाबद्दल आभार मानले.

परिसंवादाचे प्रमुख पाहुणे मा. प्राचार्य डॉ. अंबादास जाधव (डी. सी. कॉलेज, सिल्वासा) हे होते. त्यांच्या हस्ते परिसंवादाचे उद्घाटन सकाळी 10.30 वा. झाले. या परिसंवादाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. एल. डी. कदम हे होते. त्यांनी परिसंवादातील उपस्थिताना मार्गदर्शन केले. या परिसंवादाचे प्रथमसत्र साधनव्यक्ती म्हणून पुणे येथील प्रसिद्ध भूगोलतज्ञ व स. प. महाविद्यालय पुणे चे माजी भूगोल विभाग प्रमुख डॉ. श्रीकांत कार्लेकर यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी कोविड-19 च्या काळातील भौगोलिक वातावरण कसे बदलत गेले हे विविध चित्रफिती, आकृत्या, पी पी टी या द्वारे सांगितले.

परिसंवादाचे दुसऱ्या सत्रातील साधन व्यक्ति म्हणून एच. पी. टी. आर्ट्स व आर. वाय. के सायन्स कॉलेज, नाशिक येथील भूगोल विषयाच्या प्राध्यापक श्रीमती प्रगती देशमुख यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी कोविड-19 च्या काळातील भौगोलिक वातावरण कसे बदलत गेले हे विविध चित्रफिती, आकृत्या, चित्र, पी पी टी या द्वारे शहरी व ग्रामीण भागात पर्यावरणात कसे बदल झाले ते स्पष्ट केले. यानंतर सहभागी व्यक्तींचे पोष्टर प्रदर्शन झाले.

दुपारी 1.30 वा. परिसंवादाचा समारोप झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. श्रीकांत कार्लेकर हे होते. त्यांनी परिसंवाद आयोजन हे म्हत्वाचे असून भौगोलिक वातावरण व कोवीड-19 या बद्दल आपले विचार व्यक्त केले. तर या परिसंवाद समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम हे होते. त्यांनी उपस्थिताना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमा साठी देशभरातून 316 भूगोलाचे अद्यापक उपस्थित होते. ही कार्यशाळा झुम फ्लॅटफॉर्म वर आयोजित करण्यात आली होती. या परिसंवादाला सहभागी व्यक्ती कडून चांगला प्रतिसाद मिळाला. सहभागी व्यक्तिंना प्रमाणपत्रे देण्यात आली. या कार्यक्रमाचे आभार भूगोल विभागातील सहकारी प्राध्यापक वाघमारे आर. व्ही. यांनी मानले. वरील प्रमाणे हा कार्यक्रम संपन्न झाला।

**लाभार्थी संख्या: 316**

**परिसंवादाचे फलित :**

1. कोविड-19 काळात ऑनलाइन परिसंवादाचे आयोजन करता आले.
2. कोविड-19 काळातील बदलत्या भौगोलिक वातावरणाबद्दल सहभागी व्यक्तींना माहिती मिळाली.
3. वर्क फ्रॉम होम च्या काळात ऑनलाइन पध्दतीने (दूरद्रश्य प्रणाली) अध्यापक, संशोधक, विद्यार्थी व व्यक्तींना परिसंवादात सहभागी होण्याची संधी प्राप्त झाली.



**अध्यक्षीय मनोगत मा.प्राचार्य एल.डी.कदम**



**परिसंवाद शाळेचे उद्घाटन**



**परिसंवाद शाळा**

प्रमुख
भूगोल विभाग

प्राचार्य
आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर ( बुर्ली)